Savitribai Phule Pune University

# Placement & Corporate Relations Cell

**Ref. No. : PCRC / 09 /2024** **Date: 23 /02 /2024**

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये / सर्व संबंधित
मान्यता प्राप्त परिसंस्था / संशोधन संस्था / केंद्र

**विषय : नमो महारोजगार मेळाव्याबाबत ....**

महोदय / महोदया,

आपणास कळविण्यात येते की महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे **शनिवार दिनांक ०२ मार्च, २०२४ रोजी विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य, विज्ञान , महाविद्यालय बारामती पुणे** येथे विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळावा हा मोठया प्रमाणात घेण्याचे योजिले असुन अनेक उद्योजक सहभागी होणार आहेत.

आपणास विनंती करण्यात येते की आपल्या महाविद्यालयाच्या अधिनस्त असलेल्या आजी व माजी विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त करण्यास्तव रोजगार मेळाव्यात उपस्थित राहण्यासाठी सूचीत करावे. तसेच उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळेस आपल्या शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे मुळ प्रमाणपत्र व बायो–डाटा च्या छायांकीत प्रती आवश्यक प्रमाणात सोबत ठेवण्याबाबात सुचना देण्यात याव्यात.

या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रोजगार इच्छूक विद्यार्थ्यांची नोंदणी तात्काळ महास्वयम या वेबपोर्टलवर (https://rojgar.mahaswayam.gov.in) करुन घेण्याबाबात आपल्या महाविद्यालयातील प्लेसमेंट सेलचे प्रमुख व इतर सहकारी यांना निर्देश देण्यात यावेत. तसेच त्यांना सदर रोजगार मेळाव्यास प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबाबात सुचना देण्यात यावी ही विनंती.

कळावे,

23/2/2024

**प्रभारी कुलसचिव**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय

शासकीय बंगला क्र. ११, जेल रोड, येरवडा, पुणे - ४११००६

दुरध्वनी – ०२०-२६६८३६१३

वेबसाईट- www.mahaswayam.gov.in    ई मेल- rojgarddpune@gmail.com

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 16 FEB 2024
आवक क्रमांक व्हीसी 1024
जावक दिनांक 16 FEB 2024

क्र.कौविरोवउ/विआपु/बारामती रोमे/ ४९६–९७ /२०२४    दिनांक : १५/०२/२०२४

विषय :- दि. ०२ मार्च २०२४ रोजी बारामती (पुणे) येथे विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याबाबत.

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
20 FEB 2024
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 617
जावक दिनांक: 20-2-24
विभाग: PC

संदर्भ :- १. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. कौविउ-२०२४/प्र.क्र.१४/प्रशा.२ दि.०६ फेब्रुवारी २०२४

२. कौ.वि. रो.व उ. आयुक्तालय , नवी मुंबई यांचे पत्र क्र. कौविरोवउआ/ कक्ष-८/योजना/प्र.क्र.३/२४/७७५-९६ दि. २५/०१/२०२४

३. मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३/०२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील मार्गदर्शक सुचना.

PVC | Placement cell

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन दि. २४/०१/२०२४ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता तसेच उद्योजकांना आवश्यक कुशल मनुष्यबळ प्राप्त होण्यासाठी नामांकित उद्योजक/इंडस्ट्रिज यांचे समवेत **शनिवार दिनांक ०२ मार्च २०२४ रोजी विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे येथे रोजी विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

यास्तव रोजगार मेळाव्यासाठी आपल्या अधिनस्त विविध महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले अथवा शिक्षण सोडलेले अथवा पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने प्रचार प्रसिध्दी करण्याबाबत विनंती आहे. तसेच जास्तीत जास्त नोकरीइच्छूक उमेदवारांची नोंदणी महास्वयम या वेबपोर्टलवर (https://rojgar.mahaswayam.gov.in) करुन घेण्याबाबत तसेच महाविद्यालयमधील प्लेसमेंट कक्षास याबाबतची माहिती देण्याचे संबंधितांना निर्देश देण्यात यावेत. सुशिक्षित युवकांना एकाच छताखाली प्राप्त होणाऱ्या रोजगाराच्या संधीचा लाभ आपल्या शैक्षणिक संस्थातील विद्यार्थ्यांना आपण आपल्या माध्यमातून करुन देण्याबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपली स्नेहांकित.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेने.......

Placement cell

(सौ.अ.उ.पवार) १५/२/२४

उपआयुक्त

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता

विभागीय आयुक्तालय, पुणे

प्रति,

मा.कुलगुरु,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

प्रत- मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.